**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष</u>**

**<u>निशाणी १६</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – विरेश रामचंद्र नाईक

माझे वय – ३९ वर्षे,

व्यवसाय – खाजगी सुरक्षा रक्षक

राहणार – वायरी भुतनाथ, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग

**<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. टी.ए. भणगे यांचे मार्फत.</u>**

०१. दि.०४/०३/२०२१ रोजी पोलिसांनी मला एम.टी.डी.सी तारकर्ली येथे पंचनामा करण्यासाठी बोलवले होते. त्याठिकाणी जागा दाखवल्यानंतर पोलिसांनी संपूर्ण जागेची पाहणी केली. त्यानंतर पोलिसांनी त्याबाबत लिखाण केले होते. त्यावर पंच म्हणून आमची सही घेतली होती. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र.१ ला माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी पी१/पी.डब्ल्यू १</u>** दिली आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एन.पई यांचे मार्फत.</u>**

०२. मी एम.टी.डी.सी. तारकर्ली येथे खाजगी सुरक्षा रक्षक आहे. माझी पंचनाम्याच्या दिवशी सकाळी ०७.०० ते ०२.०० वा. पर्यंत डयुटी होती. वायरी भुतनाथ ते एम.टी.डी.सी. यामध्ये ३ कि.मी. अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, एम.टी.डी.सी.च्या बाजूला बरीच राहती घरे व दुकाने आहेत. एम.टी.डी.सी. येथे सी.सी.टी.व्ही.आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्यावेळेस काही सुरु होते व काही बंद होते. मी यापूर्वी कधीही पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी यापूर्वी पंच म्हणून पंचनामा न केल्याने पंचनाम्यातील मसुदा काय असतो त्यातील मजकुर काय लिहीला जातो याबाबत मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की,

पोलिसांना मी घटनास्थळावरील परिस्थिती सांगितली व पोलिसांनी त्याप्रमाणे लिहून घेतले होते असे काही घडले नव्हते. पंचनामा किती वाजता सुरु केला व किती वाजता संपला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनाम्यामध्ये घटनास्थळाचे काय वर्णन केलेले आहे हे मला सांगता येणार नाही. पोलीस शिवगण यांनी मला पंचनाम्यासाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी डयुटी संपल्यानंतर त्याठिकाणी दुसऱ्या कर्मचाऱ्याची नेमणूक होते.

०३. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कुठलाही पंचनामा झालेला नसताना, पोलिसांना मदत करण्यासाठी पंचनामा माझ्या समक्ष झाला आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष झालेला पंचनामा हाच आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

महेश रा. देवकते

दिनांक : २०/०९/२०२२ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण